॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**
**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

दूरध्वनी क्र. : 2257320 ते 323
फॅक्स नं.. : 0257-2258403/406
वेब साईट : www.nmu.ac.in

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/प्रश्नसंच/ 1164 /२०२५ दिनांक : २१.०३.२०२५

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व महाविद्यालयांचे **मा.प्राचार्य** यांना.....

**विषय : एम. ए. / एम. एस्सी. (PG) भूगोल या विषयाची प्रश्नपत्रिका इंग्रजी व मराठी या दोन्ही माध्यमातून तयार करणेबाबत...**

**महोदय,**

वरील विषयाच्या अनुषंगाने विदित करण्यात येते की, विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध वर्गाच्या / अभ्यासक्रमाच्या **उन्हाळी-२०२५** च्या लेखी परीक्षा Backlog सह **माहे एप्रिल / मे / जून, २०२५** या कालावधीत विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर **Descriptive (दिर्घोत्तरी)** पध्दतीने **दि. ०२ एप्रिल, २०२५ पासून आयोजित करण्यात येत आहेत**.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये जून, २०२४ पासून **एम. ए. / एम. एस्सी. भूगोल** हा विषय मराठी माध्यमातून शिकविणे व लिहिण्यास परवानगी देण्यात आलेली असून, प्रश्नपत्रिका देखील इंग्रजी व मराठी माध्यमातून तयार करणेसंदर्भात **दिनांक १८.०३.२०२५ रोजी झालेल्या भूगोल अभ्यास मंडळाच्या सभेत ठराव पारीत करण्यात आला आहे.**

तेव्हा, सदर ठरावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **माहे एप्रिल / मे / जून, २०२५** या कालावधीत होणाऱ्या **उन्हाळी-२०२५** च्या लेखी परीक्षेपासून **एम. ए. / एम. एस्सी. (PG) भूगोल** या विषयाची प्रश्नपत्रिका **दोन्ही** माध्यमातून तयार करण्यासाठी आपल्या महाविद्यालयात भूगोल विषय शिकवित असलेल्या शिक्षकांना आपल्यास्तरावर प्रश्नपत्रिका तयार करण्यास अवगत करुन देण्यात यावे व सदरच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा.योगेश ना.पाटील)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**
(१) मा.कुलगुरु महोदय, कबचौउमवि.,जळगाव
(२) मा.प्र-कुलगुरु महोदय, कबचौउमवि.,जळगाव
(३) मा.अध्यक्ष, भूगोल अभ्यास मंडळ,कबचौउमवि.,जळगाव